"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे"

महाराष्ट्र शासन
वनविभाग

**उप वनसंरक्षक, जुन्नर वनविभाग,**
**जुन्नर**
**मु.पो.तालुका जुन्नर, दादोजी कोंडदेववाडा,**
**जि. पुणे - 410502.**

दूरध्वनी क्र. 02132 222063
Email ID: junnarforestdn@gmail.com / dycfjunnar@mahaforest.gov.in

**क्रमांक-ब/कक्ष-४.२/जमीन/ 143 /२०२०-२१, दिनांक 28/१०/२०२०**

**पत्र-**

**प्रती,**

**श्री. एस. एस. औटी,**
**दोस्ती ॲग्रो टुरिझम सेंटर,**
**रा. करंजाळे, ता-जुन्नर, जि-पुणे.**

**विषय** : Diversion of Proposal for use of 0.121 Ha. of forest land for non-forest purpose i.e. Construction of laying open water pipeline for drinking as well as for agricultural purpose, erection of poles laying insulated electric line to supply 3PH low-tention 440 volt electricity, aerial iron cable for Cable Car and existing approach stairs pathway facilities for Dosti Agro Tourism Centre, village-Karanjale, Tal-Junnar, Dist-Pune. **(FP/MH/OTHERS/42723/2019)**

**संदर्भ** : मुख्य वनसंरक्षक (प्रा.), पुणे यांचेकडील पत्र क्र. कक्ष-४/४(२)/जमीन/एफसीए-३०५/२०२०-२१/७९, दि. १५/१०/२०२०.

विषयांकित प्रकरणी आपण मौजे करंजाळे, ता-जुन्नर, जि-पुणे येथील वनक्षेत्रातून पाण्याची पाईपलाईन, इलेक्ट्रिक लाईन, पाथवे व केबलकार टाकणेसाठी ०.१२१ हेक्टर वनजमीन हि भारतीय वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत वळतेकरण करण्याचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केला होता. सदर प्रस्तावावर मुख्य वनसंरक्षक (प्रा.), पुणे यांनी संदर्भीय पत्रान्वये त्रुटी उपस्थित केल्या आहेत. सदर पत्राची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

तरी प्रकरणी पत्रात नमूद त्रुटींची पूर्तता करून पूर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा. जेणेकरून सदरचा अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करता येईल.

सोबत-वरीलप्रमाणे.

**(जयरामेगौडा आर)**
**उप वनसंरक्षक,**
**जुन्नर वनविभाग, जुन्नर**

# मुख्य वनसंरक्षक, (प्रादेशिक), पुणे यांचे कार्यालय

'वनभवन' भांबुर्डा वनविहार, मेंढी फार्मजवळ, गोखलेनगर, पुणे-411 016

☎ (020) 25664184, ईमेल : ccftpune@gmail.com


---

**ज्ञा प न-**

जा.क्र.कक्ष-4/4(2)/जमिन/एफसीए-305/2020-21/ 179
पुणे-411 016, दिनांक 15 / 10 / 2020

विषय-: Diversion of forest land for non-forest purpose laying of open water pipeline For drinking & agricultural purpose, erection of poles laying insulated electric Line to supply 3 PH low tension 440 volt electricity, aerial iron cable for Cable car and existing approach stairs pathway facilities for Dosti Agro Tourism Centre, vill.- Karanjale, Tal.-Junnar, Dist Pune.

संदर्भ - आपलेकडील पत्र क्र.कक्ष-4/4(2)/जमीन/FCA-32/36/2020-21, दि.25/09/2020

विषयांकित प्रस्ताव संदर्भाधीन पत्रान्वये या कार्यालयास प्राप्त झाला आहे. प्राप्त प्रस्तावाचे अवलोकन केले असता त्यात खालील त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

1. अनुक्रमणिका जोडलेली नाही.
2. प्रस्तावित कामाचे अंदाजपत्रक जोडलेले नाही.
3. साईट इन्स्पेक्शन रिपोर्ट मधील अ.क्र.17 मध्ये फोटोग्राफ जोडल्याचे नमूद आहे तथापि फोटोग्राफ जोडले नाहीत. ते जोडण्यात यावेत.
4. 1 ते 34 ची चेकलिस्ट जोडलेली नाही.
5. प्रोजेक्ट रिपोर्ट मध्ये प्रस्तावित कामाची अलायमेंट दिलेली नाही.
6. केबलकारचे पिलर किती मीटर अंतरावर आहेत हे नकाशात / प्रोजेक्ट रिपोर्टमध्ये दर्शविलेले नाही.
7. ज्या शतकऱ्याचे विहीरीवरुन पाईप लाईन करावयाची आहे त्या शेतकऱ्याचे ना-हरकत प्रमाणपत्र जोडलेले नाही.
8. प्रकल्प यंत्रणेने पूर्व परवानगी न घेता इलेक्ट्रिक लाईन व पाण्याची पाईपलाईन टाकली असल्याने वन (संवर्धन) अधिनियम 1980 चे उल्लंघन झाले असल्याचे सदर प्रस्तावात नमूद केले आहे तसेच रु.5000/- दंड वसुल केल्याचेही नमूद आहे. अनुषंगिक दस्तऐवज जोडलेले नाहीत.
9. केस कंपाऊंडबाबत फायनल डिव्हीजनल ऑर्डर सोबत जोडण्यात यावी.
10. दंड भरलेल्या पावतीची छायांकित प्रत जोडण्यात यावी.
11. केबलकारचे मार्गात झाडे येत असतील तर त्याचा तपशील देण्यात यावा.
12. प्रस्तावित क्षेत्र हरिश्चंद्रगड अभयारण्याच्या जवळ असून अधिसूचनेनुसार अभयारण्य व परिसरामध्ये अनुसूचित प्राण्यांच्या अनेक प्रजाती असल्याचे व त्यामध्ये फुलांचे व प्राण्यांचे वैभव असल्याचे नमूद आहे. तसेच प्रोजेक्ट नोट मध्ये सदर जागा शासनाने घोषित केलेल्या पर्यटन तालुक्यात आहे आणि ऐतिहासिक वास्तु असल्याचे नमूद आहे. त्यानुसार प्रोजेक्ट नोटचे अवलोकन केले असता उपवनसंरक्षक यांचे अहवाल परस्परविरोधी आहेत. पुरातत्व विभागाचे प्रमाणपत्र जोडलेले नाही.
13. केबल कार मार्गाचे Cross Sectional Elevation जोडावे.
14. टर्मिनल स्टेशन, लाईन टॉवर्स इ. बांधकामासाठी लागणाऱ्या जमीनचा तपशील प्रस्तावामध्ये नमूद करावा.

वरील सर्व त्रुटींची पूर्तता करुन परिपूर्ण प्रस्ताव सादर करावा. संदर्भाधीन पत्रासोबत प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या प्रती यासोबत परत करणेत येत आहेत.

उप वन संरक्षक प्रा.प्रकल्प वन विभाग जुन्नर यांचे कार्यालय
आवक क्रमांक- 6499
दिनांक 20 OCT 2020
संकलन- F.C.A./Land
मु.लि. का.अ. उप वनसंरक्षक

**सोबत – वरीलप्रमाणे**

(सुजय दोडल)
मुख्य वनसंरक्षक (प्रा.), पुणे.

प्रति,
उपवनसंरक्षक,
जुन्नर